# महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ

**फुटाळा तलाव मार्ग, नागपूर - ४४० ००१ (महाराष्ट्र राज्य)**
**संकेतस्थळ : www.mafsu.ac.in**

## प्रवेश अधिसुचना - २०२४-२५

## पशुवैद्यकीय पदवी (बी.व्ही. एस्सी. ॲण्ड ए. एच.) अभ्यासक्रम

पशुवैद्यकीय (बी.व्ही.एस्सी. ॲण्ड ए. एच.) पदवी अभ्यासक्रमाच्या सन २०२४-२५ प्रवेशाकरीता पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, अकोला करीता ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर अभ्यासक्रमाची माहितीपुस्तिका व प्रवेश अर्ज विद्यापीठाचे संकेतस्थळा (www.mafsu.ac.in) वर **दि.१२/०३/२०२५** पासुन उपलब्ध राहतील.

**शैक्षणिक पात्रता :**

पशुवैद्यकीय पदवी प्रवेशाकरीता उमेदवार १२ वी (१० + २) परीक्षेत भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र किंवा जैवतंत्रज्ञानशास्त्र आणि इंग्रजी विषयात एकत्रितपणे अराखीव प्रवर्गाकरीता किमान ५०% गुण व राखीव प्रवर्गाकरीता ४७.५०% गुण घेवून उत्तीर्ण असणे आवश्यक असुन उमेदवाराने नॅशनल टेस्टींग ऐजंन्सी, नवी दिल्ली यांचे मार्फत घेण्यात येणारी पात्रता व प्रवेश परीक्षा **NEET (UG) - २०२४** दिलेली असणे अनिवार्य आहे.

**प्रवेश अर्ज शुल्क :**

प्रवेश अर्ज शुल्क अराखीव प्रवर्गाकरीता रु. १०००/- व राखीव प्रवर्गाकरीता रु ७००/- राहील. उमेदवाराने अर्जाचे शुल्क डेबिट कार्ड / क्रेडीट कार्ड / इंटरनेट बँकींग या द्वारे ऑनलाईन पध्दतीचा वापर करुनच भरावे.

**अर्ज करण्याची कार्यपध्दती :**

- उमेदवाराने ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.
- उमेदवाराने माहितीपुस्तीका काळजीपूर्वक वाचल्यानंतर अर्ज भरावा.
- उमेदवाराला ऑनलाईन प्रवेश अर्ज विद्यापीठाच्या संकेतस्थळाद्वारे भरता येईल. ऑनलाईन अर्ज भरण्याची तारीख, प्रवेश शुल्क संबंधीची माहिती व अर्ज सादर करण्याबाबतची माहिती उमेदवारांना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या माहितीपुस्तिकेत देण्यात आलेली आहे.
- प्रमाणपत्राचे एका पेक्षा जास्त पेजेस असल्यास (उदा. एकापेक्षा जास्त प्रयत्नात उत्तीर्ण झाल्यास दोन गुणपत्रिका, नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र इ.) त्याची एक PDF किंवा JPEG फाईल करुन अपलोड करावी.
- आवश्यक त्या संपुर्ण माहिती व प्रमाणपत्रांसह ऑनलाईन भरलेला अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत **दिनांक २१/०३/२०२५** आहे.

...२

**महत्वाच्या सुचना :**

- ऑनलाईन अर्ज भरतांना उमेदवारांनी अपलोड केलेले प्रमाणपत्र स्पष्ट दिसत असल्याची खात्री करावी.
- उमेदवाराने एकापेक्षा जास्त अर्ज केले असल्यास, संपुर्ण माहितीसह नव्याने सादर केलेला अर्ज गुणवत्ता यादीसाठी ग्राहय धरला जाईल.
- शैक्षणिक सत्र २०२४-२५ मधील निट-युजी-२०२४ या पात्रता परिक्षेची दि. २६/०७/२०२४ ची निट युजी ची पुनर्सुधारीत मार्कशिट विचारात घेतील जाईल.
- प्रमाणपत्रांच्या त्रृटींचे फेर सादरीकरण - उमेदवारांनी चुकीचे किंवा अपुर्ण दस्तावेज अपलोड केलेले असल्यास अशा उमेदवारांची यादी संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल. या उमेदवारांना विद्यापीठाने निर्दिष्ट केलेल्या विहीत तारखेच्या आत केवळ सुचित कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक राहील.
- ऑनलाईन अर्जात त्रुटीची पुर्तता करण्याच्या हेतुने दिलेल्या दिनांकानंतर कोणतेही अतिरीक्त प्रमाणपत्र स्विकारण्यात येणार नाही.
- प्रवेश अर्ज करण्यास काही मदत आवश्यक असल्यास संबंधीत महाविद्यालयात कार्यालयीन वेळे दरम्यान दुरध्वनी क्रमांक - **स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला ०७२४-२२५८८६५** व **९४२२९३८१३८** वर संपर्क करावा.

**दिनांक: १२/०३/२०२५**

**कुलसचिव**
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ
नागपूर